स्थायी समितीच्या **बुधवार** दिनांक **07.04.2010** रोजी सकाळी **11.00**वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **श्री. संदिप दिवाकर जोशी** | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. अरुणा जगदीश ग्वालबंसी | सदस्या |
| 3. | श्री. रवींद्र डोळस | सदस्य |
| 4. | सौ. ममता ठाकूर | सदस्या |
| 5. | श्री दिपक पटेल | सदस्य |
| 6. | श्री. शेषराव गोतमारे | सदस्य |
| 7. | सौ. शोभा पटेल | सदस्या |
| 8. | श्री. सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | श्री. राजेश श्रीनिवास माटे | सदस्य |
| 10. | श्री. दिपक दयाराम पेंदाम | सदस्य |
| 11. | श्री. किशोर गजभिये | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. दिपक चौधरी | सदस्य |

रिक्त स्थान – 4

## उपस्थित अधिकारी

1) श्री. प्रकाश बोखड, अति.उप आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 10 :–सतरंजीपुरा झोन क्र. 7 चे अंतर्गत वार्डातील म.रा.वि.वि.कं.लि.च्या खांबावर 50 / 70 वॅट सोडीयम दिवे लावण्याकरिता रु.13,03,063/– च्या खर्चास प्रभाग समितीने ठराव क्र.12 दि. 6.01.2010 अन्वये मंजुरी प्रदान केल्याच्या अनुषंगाने प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व ई–निविदा बोलविल्या असता मे. सोनु

इलेक्ट्रीकल्स , नागपूर यांची प्राकलनीय राशीच्या तुलनेत 1.10 टक्के ने कमी असलेली रु. 12,33,234/— ची प्राप्त एकमेव निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 11</u> :— नागपूर म.न.पा.च्या शाळेतील वर्ग 1 ते 12 पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता वहया / नोटबुक एकूण 50,343 विद्यार्थ्यांकरिता 1 रेघी 2,41,825 नग 28,00 2 नग 2 रेघी , 4 रेघी 20,927 नग इत्यादी व 200 पेजेसचे 2024 नग रजिस्टर खरेदी करावयाचे आहे. खरेदी नियमित ई—निविदा मागवून खरेदी करण्यात येईल. करिता वहया व नोटबुक निविदा मागवून खरेदी करण्यास व या अनुषंगाने येणारे रु. 29 लाख च्या खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून म.न.पा. शाळेचे शैक्षणिक सत्र सुरु होण्याच्या आत उपरोक्त पुरवठा झाला पाहिजे या दृष्टीने जुन्या कंत्राटदारास जुन्याच मान्य दरावर हे काम देण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 12</u> :— उन्हाळा 2010 मध्ये नागपूर शहरातील पाणी टंचाई वस्त्यात विंधन विहिरी खोदण्याचा कार्यक्रम राबविण्या संदर्भात खालील प्रस्तावाबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून

1. विंधन विहीरीच्या मौक्याच्या सर्व्हेक्षणचे काम शासन मंजुर दरांवर भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा यांचेकडून करवून घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजुरी प्रदान केली. .
2. 150 मि.मि. व्यासाच्या विंधन विहीरी खोदण्याचे काम शासन मंजुर दरांवर भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा हाती घेण्यास तयार असल्यास त्यांचेकडून करवून घेण्यास मंजुरी प्रदान करणे. अथवा निविदाव्दारे दर व एजेन्सी निश्चित करुन म.न.पा. तर्फे हा कार्यक्रम हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजुरी प्रदान केली. .
3. 115 मि.मि. व्यासाच्या विंधन विहीरी खोदण्याचे काम भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा करित नसल्याने या कामाचे निविदाव्दारे दर व एजेन्सी निश्चित करुन करवून घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजुरी प्रदान केली. .

<u>ठराव क्रमांक 13</u>:—जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुननिर्माण अभियाना अंतर्गत राबविण्यात आलेल्या मंजुर पाणी लेखा परिक्षणाच्या प्रकल्पिय कामातील 24 X 7 पाणी पुरवठा Pilot Project चे Independent Assessment करवून घेण्याचे काम Administrative staff college of India हैद्राबाद या संस्थेकडून करवून घेण्यास व त्याकरिता त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार लागणाऱ्या रु. 6,90,000/— च्या खर्चास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 14 :—</u> जरीपटका येथील शॉपींग मॉलचे बांधकामाकरीता मे. युनीटी इन्फ्राप्रोजेक्टस् लि. मुंबई व बि.एस.ई.ल. इन्फ्रास्ट्रक्चर रियालिटी लि. मुंबई (जे. व्ही.) द्वारा निर्मित SPV M/s. JP SHOPPING MALL AND HOTEL PRIVATE LIMITED, यांनी करारनाम्यातील अटी व शर्तीची पुर्तता न केल्यामुळे तसेच वेळोवेळी काम सुरु करण्याबाबद् कळविले असता कंत्राटदाराने दि. 04.02.10 च्या पत्रान्वये वरील काम सुरु करण्यास नकार दर्षविलेला आहे व त्यांना या कामातून मुक्त करावे असे कळविले. तरी करारनाम्यानुसार काम पूर्ण न करता बंद केल्यामुळे खालील कार्यवाही करण्याचा प्रष्न समितीने विचारात घेवून अट क्र. 1,2,3,4,6,7,8, मधील 1), व 2) अ. BOT फेरनिविदा काढण्यासह समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली. तसेच अट क्र. 5,8, व 8 मधील 2) ब ला समितीने एकमताने नामंजूरी प्रदान केली.

1. कंत्राटदाराने जमा केलेले अमानत रक्कम रु. 50.00 लक्ष जप्त करणे.
2. कंत्राटदाराने जमा केलेला रु. 150.00 लक्ष चा एक वेळेचा प्रिमियम जप्त करणे.
3. कंत्राटदारा मार्फत उभारण्यात आलेली जरीपटका येथील बांधकाम पार्किंगकरीता तळमजला–1 व तळमजला–2 व जमिनीलगत चे बांधकाम (Ground Floor) म.न.पा. च्या ताब्यात घेणे.
4. बांधकामाला चारही बाजूने केलेले सुरक्षा कुंपण जसेच्या तसे सुरक्षेच्या दृष्टीने ठेवणे.
5. नविन कंत्राट होईस्तोवर कंत्राटदाराद्वारे सुरक्षा गार्ड कायम ठेवणे.
6. या कामाकरीता तयार केलेले Drawings,Structura Designs,Measurments, Approvals व संपूर्ण कागदपत्रे इत्यादी जमा करणे.
7. झालेल्या कामांची नोंद Measurment Book मधे करणे.
8. नविन DPR, Tender documents, PMC, marketing agency for sale of shops etc. करीता येणारा खर्च कंत्राटदाराकडून वसूल करणे. करीता वरील अटींचा समावेष करुन

1) कंत्राटदाराला कंत्राटापासून मुक्त करणे. तसेच

2) नविन प्रकल्पाचे स्वरुप

अ. BOT.

ब. Tender + Adv- Deposit ठरवून फेरनिविदा काढण्याचा प्रष्न समितीने विचारात घेणे

<u>ठराव क्रमांक 15 :–</u> दानागंज येथील शॉपींग मॉलचे बांधकामाकरीता मे. युनीटी इन्फ्राप्रोजेक्टस् लि. मुंबई व बि.एस.ई.ल. इन्फ्रास्ट्रक्चर रियालिटी लि. मुंबई (जे. व्ही.) द्वारा निर्मित SPV M/s. DG MALLS MULTIPLEX PRIVATE LIMITED, यांनी करारनाम्यातील अटी व शर्तीची पुर्तता न केल्यामुळे तसेच वेळोवेळी काम सुरु करण्याबाबद् कळविले असता कंत्राटदाराने दि. 4.2.10 च्या पत्रान्वये वरील काम सुरु करण्यास नकार दर्षविलेला आहे व त्यांना या कामातून मुक्त करावे असे कळविले. तरी करारनाम्यानुसार काम पूर्ण न करता बंद केल्यामुळेखालील कार्यवाही करण्याचा प्रष्न समितीने विचारात घेवुन

अट क्र. १,२,३,४,७,८,९ मधील १), २) अ.BOT फेरनिविदा काढण्यासह समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

अट क्र. ५,९, व ९ मधील २) ब ला समितीने एकमताने नामंजूरी प्रदान केली.

अट क्र. 6 Retaining Wall चे मानवी व वितिय दृष्टीकोनातून घरांना बाधा होऊ नये म्हणून आवश्यक ते काम कंत्राटदाराकडून पूर्ण करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. कंत्राटदाराने जमा केलेले अमानत रक्कम रु. 50.00 लक्ष जप्त करणे.
2. कंत्राटदाराने जमा केलेला रु. 250.00 लक्ष चा एक वेळेचा प्रिमियम जप्त करणे.
3. कंत्राटदारा मार्फत उभारण्यात आलेली दानागंज येथील बांधकाम पार्किंगकरीता तळमजला–1 व तळमजला–2 व जमिनीलगत चे बांधकाम (Ground Floor) म.न.पा. च्या ताब्यात घेणे.
4. बांधकामाला चारही बाजूने केलेले सुरक्षा कुंपण जसेच्या तसे सुरक्षेच्या दृष्टीने ठेवणे.
5. नविन कंत्राट होईस्तोवर कंत्राटदाराद्वारे सुरक्षा गार्ड कायम ठेवणे.
6. वरील बांधकामामुळे लोकांना/सहभोवताल घरांना बाधा होऊ नये या दृष्टीने दानागंज येथील उत्तर दिषेला बांधलेल्या Retaining wall चे काम पूर्ण करून सुरक्षेच्या तात्पुरत्या उपाययोजना जसेच्या तसे ठेवणे.
7. या कामाकरीता तयार केलेले Drawings, Structural Designs, Measurments , Approvals व संपूर्ण कागदपत्रे इत्यादी जमा करणे.
8. झालेल्या कामांची नोंद Measurment Book मधे करणे.
9. नविन DPR, Tender documents, PMC, marketing agency for sale of shops etc. करीता येणारा खर्च कंत्राटदाराकडून वसूल करणे.

करीता वरील अटींचा समावेश करुन

१) कंत्राटदाराला कंत्राटापासून मुक्त करणे. तसेच

2) नविन प्रकल्पाचे स्वरुप

अ. BOT.

ब. Tender + Adv- Deposit ठरवून फेरनिविदा काढण्याचा प्रश्न विचारात घेणे.

<u>ठराव क्रमांक 16 :–</u> नागपूर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांची आस्थापना सुची वेतनश्रेणी नूसार मंजूर करण्यांचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. .

सद्यास्थितीत नागपूर मनपा. आस्थापनेवर (शिक्षक वगळता) वर्ग 1 ते 4 मध्ये अंदाजे 9837 पदे विविध संवर्गात मंजूर आहे. (सफाई कामगारासह)

विविध विभागात कार्यरत असलेल्या वर्ग 1 ते वर्ग 4 च्या विविध पदांचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की यातील वर्ग 3 व 4 मधील काही पदे कालबाहय झालेली आहे. परंतू आस्थापना सुचीमध्ये अद्यापही कायम आहेत. त्यामुळे ती पदे निर्लेखीत करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मनपा. सेवेच्या विविध आस्थापनेवर नव्याने काही पदे निर्माण करणे आवश्यक आहे याबाबत म.न.पा.तील सर्व पदांचा आढावा घेवून मनपा करीता नव्याने आस्थापना सुची तयार करणे आवश्यक आहे त्यानूसार विभागनिहाय सघस्थितीत मंजूर असलेली पदे, आवश्यक असलेली पदे, निर्लेखीत करावयाची पदे, त्या पदांची वेतनश्रेणी इत्यादीबाबत सविस्तर आढावा घेण्यात येवून या पदांची वर्ग 1 ते 4 वेतनश्रेणीनूसार विभागनिहाय सुची तयार करण्यात आली. त्यानूसार मनपातील वर्ग 1 ते 4 ची पदे एकुण 13 वर्गवारीत मोडतात व या 13 वर्गवारीतील वर्ग 1 ते 4 मधील पदे म.न. पा.चे काही विभाग सोडून जवळ – जवळ सर्वच विभागात कार्यरत आहेत.

वरील नूसार मनपा.च्या सर्वच विभाग प्रमुखांकडुन त्यांच्या विभागात सध्यास्थितीत असलेल्या कर्मचांरी वेतनश्रेणीनूसार माहिती मागविण्यात आली . व सर्व विभाग प्रमुखांशी प्रत्यक्ष चर्चा करून त्यांचे विभागात आवश्यक असलेली पदे, निर्लेखीत करण्याची पदे व नव्याने निर्माण करावयाची पदे याचा आराखडा तयार करण्यात आला. तो सोबत जोडलेला आहे.

आराखडयानूसार म.न.पा.तील कर्मचाऱ्यांची सद्यास्थिती आवश्यक पदे, निर्लेखीत करावयाची पदे, या पदांच्या वेतनावर सद्यास्थितीत येणारा, अंदाजीत खर्च, व नवीन आकृतीबंधानूसार दरमहा येणाऱ्या अंदाजित खर्चाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

1) सद्यास्थितीती अंदाजीत पदे (शिक्षक वगळुन) – 9837

2) प्रत्यक्ष आवश्यक पदे – 9798

3) निर्लेखित करावयाची पदे – 3

4) सद्यास्थितीत प्रतीमहा येणारा अंदाजीत खर्च, – रू. 30,117,000 ⁄ –
(हा खर्च सर्व संवर्गातील पदांचे मुळ वेतन लक्षात घेवून अंदाजीत काढण्यात आलेला आहे. मात्रा वेतनावरील सद्यास्थितीत खर्च हा कर्मचाऱ्यांच्या रू. ............................... आहे.)

5) प्रस्तवित कर्मचारी सुचीनूसार अपेक्षित वेतनवरील प्रती – रू. 30,684,000 ⁄ –
महा खर्च – (हा खर्च सर्व संवर्गाने पदांचे मुळ वेतन लक्षात घेवून काढण्यात आलेला आहे.)

6) उपरोक्त नूसार प्रतीमाह वेतनावर होणारी बचत. – रू. 5,67,000 ⁄ –

वार्षीक बचत — रू. 68,04,000 ⁄ —

वरील कर्मचारी आस्थापना सूची नूसार वर्ग 1 ते 4 चा वेतनावरील खर्च हा सद्यास्थितीत 5 व्या वेतन आयोगानूसार काढण्यात आलेला आहे. मनपाच्या कर्मचाऱ्यांना 6 वा वेतन आयोग देण्याचे प्रस्तावित आहे. हयाबाबत 6 व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी निश्चित करण्याकरीता मा. अपर आयुक्त हयांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करण्यात आलेली होती. व त्या समितीने आपला अहवाल सादर केलेला आहे. तो सोबत जोडण्यात आलेला आहे.

प्रस्तावित उपरोक्त कर्मचारी आस्थापना सूचीत एकूण पदे लक्षात घेता 6 व्या वेतन आयोगानुसार वेतनावर येणाऱ्या खर्चाची स्थिती खालीलप्रमाणे राहील.

1) सद्यास्थितीत अंदाजीत पदे — 9837

2) प्रत्यक्ष आवश्यक पदे — 9798

3) निर्लेखित करावयाची पदे — 39

4) सद्यास्थितीत प्रतीमहा येणारा अंदाजीत खर्च, — 69,468,00 ⁄ —
(हा खर्च सर्व संवर्गातील पदांचे मुळ वेतन लक्षात घेवून अंदाजीत काढण्यात आलेला आहे.)

5) प्रस्तवित कर्मचारी सुचीनूसार अपेक्षित वेतनवरील प्रती महा खर्च — 69,468,500 ⁄ — हा खर्च सर्व संवर्गाने पदांचे मुळ वेतन लक्षात घेवून काढण्यात आलेला आहे.

6) उपरोक्त नूसार प्रतीमहा वेतनावर अंदाजीत वाढणार खर्च — 39,351,500 ⁄ —
वार्षीक अंदाजित वाढणारा खर्च — 472,218,000 ⁄ —

करीता प्रस्तावित कर्मचारी आस्थापना सूची मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. सहाव्या वेतन आयोगामुळे वाढणारा आर्थिक बोझा पाहता म.न.पा.च्या आय पैकी जास्तीत जास्त हिस्सा विकास काम वर खर्च करण्यांच्या दृष्टीने तसेच प्रशासकीय खर्च शासनद्वारा विहीत मर्यादेत नसल्यामुळे नवीन वेतन द्यावयाची शिफारस लागु करण्यांत येणारी अडचणी लक्षांत घेता प्रशासकीय खर्च आटोक्यांत आणण्यांसाठी प्रशासकीय सुधारणांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार खालील प्रशासकीय सुधारणा प्रशासनातर्फे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

**1) म.न.पा.तील वर्ग 4 ची नवीन पदांसंदर्भात :—**

म.न.पा.त सध्या स्थितीत साफ—सफाई, व इतर काही विभागातील कामे कंत्राटी तत्वावर होत असल्यामुळे तसेच ई—गर्व्हनर्स प्रणाली लवकरच सुरू होणार असल्यामुळे वर्ग 4 च्या कर्मचा—यांची जास्त आवश्यक पडणार नाही. त्यामुळे वर्ग 4 ची सरळसेवा भरती बंद केल्यास म.न.पा.च्या आस्थापना खर्चात बचत होईल.

**2) म.न.पा.तील सेवा पी. पी. पी. मोड वर देणे :—**

म.न.पा.द्वारे नागरीकांना देण्यांत येणा—या सुविधा हया खाजगी कंत्र्याटदारामार्फत देण्यांत याव्या. (नागरी सुविधा केंद्र, पाणी बिल वाटप, कर बिल वाटप, टॅक्टरद्वारे पाणी पूरवठा,) नागरीकांना देण्यांत येणा—या सुविधा हया खाजगी कंत्र्याटाद्वारे देण्यांत आल्या तर तेथील कर्मचारी वर्ग इतर विभागांच्या कामाकरीता वापरल्या जावू शकतो. त्यामुळे नवीन पद भरतीची आवश्यकता भासणार नाही. तसेच म.न.पा.द्वारा देण्यांत येणारी सेवाचा दर्जा उंचाविण्यांस पी.पी.पी. मोडवर सेवा देण्यांचा निर्णय दिल्यास मदत होईल.

**3) जकात खाजगीकरण :—**

नागपूर शहराची हद्द ही मोठया प्रमाणावर वाढलेली आह. तसेच नागपूर शहरातील व्यापार देखील वाढलेला असल्याने बरेच जास्तीचे नाके उभारण्यांत आलेले आहे व हया नाक्यांकरीता म.न.पा.त असलेला कर्मचारी वर्ग कमी पडत आहे. करीता म.न.पा.ची जकात वसुली ही खाजगी कंत्र्याटदारामार्फत वसुल केल्यास जकातीच्या उत्पन्नात भरीव अशी वाढ अपेक्षित आहे.

**4) नविन वाहनांची खरेदी बंद व त्या अनुषंगाने वाहन चालकाची पद भरती बंद :—**

म.न.पा.त कार्यरत असलेली वाहने नियमित सुरू ठेवून नवीन वाहने खरेदी बंद केल्यास म.न.पा. खर्च कपात होवू शकेल. त्यामुळे नविन वाहन चालकांची आवश्यकता राहणार नाही त्यामुळे आस्थापना खर्च कमी करता येवू शकेल. वाहनांची आवश्यक भासल्यास कंत्र्याटी तत्वावर वाहन उपलब्ध करून देता येवून शकेल.

करीता प्रस्तावित कर्मचारी आकृतीबंध (वेतनश्रेणीनुसार) तसेच वेतनावर येणारा खर्च तसेच सहाव्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी मान्यतेस्तव सादर करण्यांत आलेला प्रश्न समितीने विचारात घेवून कार्यालयाने प्रस्तावित केलेल्या विषयाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे द्वि सदस्यीय समिती गठीत करण्यात येते.

1. श्री. रविंद्र डोळस — अध्यक्ष
2. श्री. राजेश माटे — सदस्य

प्रस्तावित विषयाचा अभ्यास करुन योग्य दुरुस्ती व फेरबदल करुन संपूर्ण अहवाल सभागृहाच्या मान्यतेसाठी पाठविण्याचे संपूर्ण अधिकार गठीत समितीला देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 17</u> :— म.न.पा. च्या विविध विभागातर्फे (2) दोन लक्ष रुपयाचे वर दिलेल्या सविदांचे वर्क ऑडर च्या अनुषंगाने कलम 63 (डी ) नुसार नोंद घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून एकमताने नोंद घेतली.